# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सुष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक – ४१२/२०२४ दिनांक- ०७/११/२०२४

## प्रेस नोट

### " पोलीस उप आयुक्त परिमंडळ-१ कार्यक्षेत्रातील पोलीसांकडुन ऑल आउट, कोबिंग ऑपरेशन."

विधानसभा निवडणुक २०२४ च्या अनुषंगाने दिनांक १५.१०.२०२४ पासुन आचार संहिता लागु करण्यात आली असुन त्याअनुषंगाने मिरा-भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालया अंतर्गत परिमंडळ-१ अधिनस्त काशिमीरा, काशिगांव, मिरारोड, नयानगर, नवघर, भाईंदर, उत्तन पोलीस ठाण्यात दिनांक ०५.११.२०२४ रोजी ऑल आउट, कोबिंग ऑपरेशन व नाकाबंदी राबवण्यात आली होती.

श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय, श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय व परिमंडळ-१ अधिनस्त विभागीय ३ सहाय्यक पोलीस आयुक्त, पोलीस निरीक्षक – १४, सहा.पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक-३८ व पोलीस अंमलदार- १४० यांनी सदर कारवाईत सहभाग घेतला. ऑल आउट कोबिंग ऑपरेशन दरम्यान पाहीजे/फरारी ७ आरोपीत मिळुन आले त्यांना ताब्यात घेवुन कारवाई करण्यात आलेली आहे, एन.डी.पी.एस. कायदयान्वये अंमली पदार्थाचे सेवन केल्याबाबत ६ इसमावर केसेस करण्यात आल्या, ७ इसमावर बी.एन.एस.एस. प्रमाणे प्रतिबंधत्मक कारवाई करण्यात आली, दारुबंदी कायद्यान्वये १० गुन्हे दाखल करण्यात आले, कोप्ता अंतर्गत २ एन.सी. दाखल केल्या, १२ हिस्ट्रीशिटर तपासले, ०५ तडीपार इसमाना तपासले, ५१ हॉटेल व लॉजेस तपासले. ७ पोलीस ठाणे हद्दीत नाकाबंदीचे आयोजन करण्यात आले होते. नाकाबंदीच्या वेळी मोटार वाहन कायदया अन्वये ४४ केसेस करण्यात आल्या आहेत.

------ooooo-------